**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्रमांक ०२२-८१०३९३ Email shrikant.pulkundwar@nic.

---

क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३/कामगार-४ दिनांक : ०६/०५/२०२०

प्रति,

संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
कामगार भवन, ५ वा मजला,
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)
मुंबई -४०००५१

**विषय :** कारखानदारांना कामगारांच्या कामाचे तासांकरिता कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५१, ५२, ५४ आणि ५६ मधून सूट देणेबाबत

**संदर्भ:** १) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर यांचे दि. १६ एप्रिल, २०२० चे विनंती पत्र
२) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे दिनांक २३ एप्रिल, २०२० चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर यांच्या दिनांक १६ एप्रिल, २०२० च्या विनंती पत्राच्या अनुषंगाने आपल्या संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सविस्तर अभिप्राय शासनास पाठविण्यात आलेले आहेत.

२. आपल्या अभिप्रायानुसार सद्याची राज्यातील कोवीड विषाणू साथीची परिस्थिती, राज्यातील कारखान्याकडे उपलब्ध असलेल्या कामगारांची संख्या तसेच याबाबत तातडीने करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबींचा विचार करुन आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार राज्य शासनास कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारात

राज्यातील ज्या कारखान्यामध्ये कामगारांची कमतरता भासत असेल केवळ अशाच कारखान्यांना दिनांक ३० जून २०२० पर्यंत कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ (३) च्या अटी च्या अधीन राहून तसेच खालील नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५१,५२,५४ आणि ५६ मधून सूट देण्यात येत असून त्या कारखान्यांना उपलब्ध कामगारांकडून १२ तासांच्या दोन पाळयामध्ये (Shift) कारखाना चालविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ही सूट कारखाना अधिनियम १९४८ च्या कलम ६५ (३) च्या अटींच्या व खालील अटींच्या अधीन राहील.

i) अतिकालीक कामाचे वेतन हे साधारण वेतनाच्या दुप्पट दराने दिले पाहिजे.

ii) कामगारांच्या कामाच्या वेळेतील बदलाचा रासायनिक किंवा इतर धोकादायक कारखान्यातील सुरक्षिततेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी भोगवटदाराची राहिल.

iii) कोणत्याही दिवशी कामाचे तास १२ तासापेक्षा जास्त नसावेत.

iv) कोणत्याही दिवशी कामाचे तास हे विश्रांतीच्या वेळेसह तेरा तासापेक्षा अधिक असू नयेत.

v) कोणत्याही आठवडयात एकूण कामाचे तास साठ तासापेक्षा अधिक असू नयेत.

vi) कोणत्याही कामगारास सलग सात दिवस अतिकालीक काम देऊ नये. तसेच कोणत्याही तिमाहीत अतिकालीक कामांचे तास हे ११५ तासांपेक्षा जास्त असू नयेत.

vii) करोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी कारखान्याच्या भोगवटादाराने आवश्यक सर्व खबरदारी घेतली पाहिजे.

viii) कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेदरम्यान दोन कामगारामध्ये सुरक्षित अंतर ठेवावे. तसेच मास्कचा वापर अनिवार्य करावा.

ix) सदर सूट कालावधी दिनांक ३० जून, २०२० पर्यंत कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६४ मध्ये विनिर्दिष्टित केलेनुसार समजण्यात यावा.

( डॉ. श्री.ल. पुलकुंडवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन